# ग्रंथव्यवसाय वाढविण्यासाठी प्रकाशकांनी एकत्र येण्याची गरज -रामदास भटकळ

## इंडिया प्रिंटिंग वर्क्सच्या ८०व्या वर्धापनदिनानिमित्त चर्चासत्र

**प्रतिनिधी**

मराठी प्रकाशन क्षेत्रात वितरण, प्रसिद्धी अशी अनेक आव्हाने समोर असून ती पेलत खेडोपाडयांमध्ये ग्रंथसंपदा नेऊन व्यवसाय वाढवण्यासाठी प्रकाशकांनी एकत्र येण्याची गरज आहे, असे मत पॉप्युलर प्रकाशनचे प्रमुख डॉ. रामदास भटकळ यांनी व्यक्त केले. इंडिया प्रिंटिंग वर्क्स या छापखान्याला ८० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आनंद लिमये यांनी मराठी प्रकाशनसृष्टीतील प्रकाशकांची चर्चा आयोजित केली होती. वांद्रे येथील एमआयजी क्लबमध्ये झालेल्या चर्चेत डॉ. रामदास भटकळ बोलत होते. या वेळी मराठी प्रकाशनसृष्टीतील अनेक मान्यवर प्रकाशक उपस्थित होते.

चर्चासत्राच्या सुरुवातीला ‘प्रिंट वीक’ या साप्ताहिकाच्या रामू रामनाथन यांनी मुद्रण व्यवसाय, त्याची जगातील परिमाणे आणि भारत या विषयावर एक सादरीकरण केले. त्यात त्यांनी मराठी भाषेतील मुद्रणव्यवसायाचाही आढावा घेतला. त्यानंतर मराठीतील पॉप्युलर, मॅजेस्टिक, ग्रंथाली, मौज आदी मान्यवर प्रकाशन संस्थांच्या प्रतिनिधींनी प्रकाशन व्यवसायातील आव्हानांवर खल केला. या वेळी बुक गंगा या ई-बुक संस्थेचे डॉ. गजानन सबनीस आणि पेठे हेदेखील उपस्थित होते.

सध्या प्रकाशन व्यवसायासमोर आपली पुस्तके महाराष्ट्रातील खेडोपाडयांमध्ये वितरीत करण्याचे मोठे आव्हान आहे. या आव्हानावर मात करण्यासाठी काय उपाययोजना करता येतील, याबाबत या चर्चासत्रात साधकबाधक चर्चा झाली. पुस्तकविक्रेते गावोगावी निर्माण करण्यासाठी एकमेकांच्या सहकार्याने काम करता येईल का, प्रकाशन संस्थेच्या ओळखीची माणसे वितरक म्हणून नेमता येतील का, अशा अनेक शक्यतांवर या वेळी खल झाला. त्यानंतर प्रसिद्धीसाठीही काय करता येईल, याबाबत सर्वांनीच आपले विचार मांडले. त्यासाठी प्रदर्शन, ई-मेलवरून प्रसिद्धी, एकत्र येऊन दर रविवारी वर्तमानपत्रांना जाहिरात देऊन प्रसिद्धी करणे, असे अनेक पर्याय मांडण्यात आले.

वितरण आणि प्रसिद्धी याचप्रमाणे वित्तीय साहाय्याबाबतही चर्चा झाली. यात प्रत्येक प्रकाशन संस्थेने काही ठरावीक रक्कम काढून एक फंड उभा करायचा का, तसा केल्यास त्याची जबाबदारी कोणाची, अशा अनेक प्रश्नांबद्दल सर्वांनीच आपली मते मांडली. ई-बुक्स या संकल्पनेचा उपयोग कसा करता येईल, ऑडिओ बुक्सची संकल्पना कशी राबवली जाईल, याकडेही

सर्वांनी लक्ष दिले. या अशा प्रकारच्या बैठकी वारंवार घेतल्या जाव्यात, याबाबतही सर्वांचे एकमत झाले.